**महाराष्ट्र शासन**

**आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, जालना**

**<u>जाहिरातीची सुचना</u>**

जालना जिल्हा अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर 7 वैद्यकिय अधिकारी यांची पदे रिक्त आहेत. सदर रिक्त असलेली तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांची पदे एम.बी.बी.एस/बी.ए.एम.एस. पदवी धारकांमधून कंत्राटी पध्दतीने 11 महिणेसाठी थेट मुलाखतीने (Walk in Interview) द्वारे भरावयाची आहेत. यासाठी पदवीच्या अंतिम वर्षाचे गुण, अतिरीक्त शैक्षणीक अर्हता धारक व अनुभव धारकास प्राधान्य देवून गुणवत्ता यादी तयार करुन नेमणुक देण्यात येणार आहे. प्रथम एम.बी.बी.एस पदवी धारकामधून उमेदवारांची निवड करण्यात येईल. पदे रिक्त राहिल्यास बी.ए.एम.एस. पदवी धारकांचा विचार केला जाईल. तसेच एक वर्षापर्यंत नेमणुकीनंतर पदे रिक्त झाल्यास या निवड यादीमधून गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल.

यासाठी दिनांक 21/04/2021 रोजी कै.वसंतराव नाईक कृषीसभा गृह जिल्हा परिषदेचे आवार, जालना येथे सकाळी 11.00 वाजता पात्र उमेदवारांनी मुळ कागदपत्रासह वेळेत उपस्थीत राहावे. विहित वेळेनंतर उपस्थीत उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. तसेच या बाबतची सुचना **<u>www.jalna.gov.in</u>** या संकेतस्थळावर देखील प्रकाशीत करण्यात आली आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद जालना

Scanned with CamScanner